# पुणे महानगरपालिका
# स्थायी समिती
# कार्यपत्रिका क्र.८
# सभा क्र.९, दि.२४/०५/२०२४ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची (साप्ताहिक) सभा शुक्रवार, दिनांक २४/०५/२०२४ रोजी, दुपारी ४.०० (चार) वाजता, मा.महापालिका आयुक्त कार्यालय, ४ था मजला, पुणे महानगरपालिका भवन, पुणे येथे संपन्न झाली.

सदर सभेस पुढील अधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| मा. डॉ.राजेंद्र भोसले | – | प्रशासक तथा महापालिका आयुक्त, पुणे मनपा |
| मा. प्रशांत वाघमारे | – | मा.शहर अभियंता |
| मा. अनिरूध्द पावसकर | – | मा.मुख्य अभियंता पथ |
| मा. येवलेकर | – | मा.अधीक्षक अभियंता (बांधकाम) |
| मा.सौ.उल्का कळसकर | – | मा.मुख्यलेखा व वित्त अधिकारी |
| श्रीमती योगिता भोसले | – | प्रभारी नगरसचिव |

**मा.प्रशासक –** सभेला सुरूवात करावी.

## कार्यपत्रिकेवरील विषय

## उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

**विषय क्र.४६**

उप आयुक्त, परिमंडळ क्र.४ कार्यालयाचे नियंत्रणाखालील हडपसर-मुंढवा, वानवडी-रामटेकडी व कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयांकडील १४ मुद्द्यांबाबतची माहे एप्रिल २०२४ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ क्र.४ यांचे जा.क्र.६२९,दि.२०/०५/२०२४ चे पत्र

**मा.प्रशासक –** अहवालाची नोंद घेण्यात आली.

**निर्णय :– सदर अहवालाची नोंद घेण्यात आली.**

## संकीर्ण

विषय क्र.४७

पुणे पेठ वडगाव खुर्द स.नं. ४७/१अ/१क व ४७/१/२अ व वडगाव खुर्द स.नं. ५१ या मिळकती मधील २४ मी. डी.पी. रस्त्याने बाधित क्षेत्र व वडगाव खुर्द स.नं. ५५/१ येथील १८ मी. रुंद डी.पी. रस्त्याने बाधित क्षेत्र व पुणे पेठ धायरी स.न. १८०/२ या मिळकती मधील ३० मी. डी.पी. रस्त्याने बाधित क्षेत्र या जागे संदर्भात महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये दिलेल्या परचेस नोटीस नुसार भुसंपादनाची कार्यवाही सुरू करणेस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शआ/४१, दि.२१/०५/२०२४ चे पत्र.

**मा.प्रशासक –** सदर विषय मान्य करण्यात यावा

**निर्णय :–सदर विषय मान्य करण्यात आला.**

विषय क्र.४८

पुणे महानगरपालिकेकडील नजीकच्या जमाखर्चाचा विचार करता र.रु.४९०.०० कोटी १२ महिने, ३६५/३६६ दिवस, ६ महिने / १८१ दिवस किंवा त्यापेक्षा कमी / जास्त कालावधीसाठी गुंतवणूक करणेस उपलब्ध होत असल्याने रक्कमरु.४९०.००कोटी ७०% प्रमाणे मे. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.संकीर्ण- २०२४ / प्र.क्र.१४ / नवि-०४, दि.१४ /०२ /२०२४ नुसार राष्ट्रीयकृत बँकांसोबत ज्या खासगी बँका र.रु.१६००० कोटी पेक्षा जास्त नक्त मूल्य असणाऱ्या व Reserve Bank Of India यांच्या Domestic Systemically Important Banks च्या यादीत नावे असणाऱ्या खासगी बँकांमध्ये किंवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम१९४९ चे कलम ९२ नुसार सार्वजनिक कर्ज रोख्यात किंवा केंद्र सरकार, राज्य शासन, शासनाचे उपक्रम, शासनाच्या वित्तीय संस्था किंवा युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया, यांच्या कर्जरोख्यांमध्ये किंवा ऋणपत्रांमध्ये गुंतवणूक करणेस, गुंतवणुकीचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना देणेस व आवश्यकता भासलेस सदरची गुंतवणूक मुदतपूर्व मोकळी करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुले/४३,दि.२२/०५/२०२४ चे पत्र.

**मा.प्रशासक –** सदर विषय मान्य करण्यात यावा

**निर्णय :– सदर विषय मान्य करण्यात आला.**

**विषय क्र.४९**

पुणे महानगरपालिकेकडील नजीकच्या जमाखर्चाचा विचार करता र.रु.२१०.०० कोटी १२ महिने, ३६५ / ३६६ दिवस, ६ महिने / १८१ दिवस किंवा त्यापेक्षा कमी / जास्त कालावधीसाठी गुंतवणूक करणेस उपलब्ध होत असल्याने रक्कम रु.२१०.०० कोटी३०% प्रमाणे मे. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.संकीर्ण- २०२४/प्र.क्र.१४/नवि-०४,दि.१४/०२/२०२४ नुसार राष्ट्रीयकृत बँकांसोबत ज्या खासगी बँका र.रु.१६००० कोटी पेक्षाजास्त नक्त मूल्य असणाऱ्या व Reserve Bank Of India यांच्या Domestic Systemically Important Banks च्या यादीत नावे असणाऱ्या खासगी बँकांमध्ये किंवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९२ नुसार सार्वजनिक कर्ज रोख्यात किंवा केंद्र सरकार, राज्यशासन, शासनाचेउपक्रम, शासनाच्या वित्तीय संस्था किंवा युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया, यांच्या कर्जरोख्यांमध्ये किंवा ऋणपत्रां मध्ये गुंतवणूक करणेस, गुंतवणुकीचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना देणेस व आवश्यकता भासलेस सदरची गुंतवणूक मुदतपूर्व मोकळी करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ / मुले / ४४,दि.२२/०५/२०२४ चे पत्र.

**मा.प्रशासक** – सदर विषय मान्य करण्यात यावा

**निर्णय :– सदर विषय मान्य करण्यात आला.**

अशा पध्दतीने सभेचे कामकाज होऊन सभा समाप्त झाली.

**स्वाक्षरी/–xxx**
**(योगिता भोसले)**
**प्र.नगसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**वृत्तांत मंजूर.**

**स्वाक्षरी/–xxx**
**(डॉ.राजेंद्र भोसले)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**